# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ९९ किंमत : ५ रु. | पाने ४


**दिन विशेष...**

१८३६ : स्वामी रामकृष्ण परमहंस यांची जयंती

१८७१ :हिंदू धर्माचे पहिले मिशनरी विषष्णूबुवा ब्रम्हचारी यांचे निधन झाले.

१८३६ क्रांतिकारक वासूदेव बळवंत फडके यांचा एडनच्या तुरुंगांत मृत्यू १९४४

१८८८: परमाणू रचना व गुणधर्माचे अभ्यासक 'ऑटोस्टर्न' याचा जनन्म झाला

सेन्सेक्स ८२,६२६.७६ −१,०४८.१६(१.२५%)

डॉलर ₹ ९०.५६

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३५ | १६ |
| दिल्ली | २९ | १३ |
| मुंबई | ३४ | २१ |
| नागपूर | ३२ | १७ |
| पुणे | ३४ | १२ |

**सुविचार**

सुख-दु:ख हे जीवनाचे दोन पैलू आहेत, त्यांचे स्वीकारणे हेच जीवनाचे सौंदर्य आहे.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:५८ संध्या-६:२६

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५७,१९५/- २,७५,०००/-

**केळी भाव**

नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

# उद्योगांसाठी 'ओपन ॲक्सेस'; १६ हजार मेगावॅट सौर ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली घोषणा

वृत्तसंस्था । पुणे

**राज्यात आशियातील सर्वांत मोठा विकेंद्रित सौर ऊर्जा कार्यक्रम राबवला जात असून, या वर्षाअखेर १६ हजार मेगावॅट सौर ऊर्जा उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी दिली. 'महाराष्ट्र सोलर मॅन्युफ क्चरर्स असोसिएशन'च्या (मास्मा) वतीने आयोजित 'मास्मा रिन्युएबल एनर्जी एक्स्पो २०२६'चे उद्घाटन त्यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे केले, त्या वेळी ते बोलत होते.**

शेतकऱ्यांना दिवसा अखंड वीज, उद्योगांना परवडणाऱ्या दरात वीज आणि लघुउद्योगांच्या ऊर्जाखर्चात बचत व्हावी, म्हणून सौर ऊर्जेचा विस्तार



विकासाचा मूलाधार ठरत असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी अधोरेखित केले.

फडणवीस म्हणाले, 'सौर ऊर्जा ही केवळ पर्यावरणपूरकतेसाठीचा पर्याय राहिला नसून महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीची, ऊर्जा सुरक्षिततेची आणि आत्मनिर्भर भारताच्या संकल्पपूर्तीसाठी 'मास्टर की' ठरली आहे. राज्य सरकारने सौर ऊर्जा धोरण, छतावरील सौर प्रोत्साहन योजना, पीएम सूर्यघर योजना, पीएम कुसूम योजना, सौर उद्याने, ऊर्जा साठवण प्रकल्प आणि ग्रीन एनर्जी कॉरिडॉर यांच्या माध्यमातून अक्षय ऊर्जेला गती दिली आहे.'

ऊर्जा स्वावलंबी आणि विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी शासन, उद्योग, तंत्रज्ञान संस्था, संशोधन केंद्रे आणि शेतकरी यांचा (पान २ वर)

### ➤ उद्योगांसाठी मुक्त प्रवेश

**उद्योगांसाठी मुक्त प्रवेश (ओपन ॲक्सेस) सुलभ करणार असल्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. ग्रीन हायड्रोजनला प्रोत्साहन देणे, सौर ऊर्जा साठवण तंत्रज्ञान विकसित करणे आणि तरुणांसाठी ग्रीन जॉब्स निर्माण करणे, यावर विशेष भर देणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.**

# राज्यभरातील सर्व ग्रामपंचायती २० फेब्रुवारीस राहणार बंद




वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यभरातील ग्रामपंचायत स्तरावरील विविध मागण्यांसाठी २० फेब्रुवारी रोजी (शुक्रवार) राज्यव्यापी आंदोलन करण्यात येणार आहे. या दिवशी राज्यभरातील सर्व ग्रामपंचायती बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

राज्यातील १६ हजारांहून अधिक ग्रामपंचायतींची मुदत संपत आल्याने या ग्रामपंचायतींवर शासकीय कर्मचाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली जात आहे. मात्र, सरपंच व विद्यमान लोकप्रतिनिधींनाच प्रशासकपदाची जबाबदारी देण्यात यावी, यासह विविध प्रलंबित मागण्यांसाठी राज्यातील सर्व ग्रामपंचायती शुक्रवारी (दि. २०) बंद ठेवण्यात येणार असल्याची घोषणा अखिल भारतीय सरपंच परिषदेने केली आहे.

शासकीय कर्मचारी प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आल्याने गावांच्या विकासकामांना मोठा फटका बसत असल्याचा आरोप अखिल भारतीय सरपंच परिषद यांनी केला आहे. या संदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत अखिल भारतीय सरपंच परिषदेचे अध्यक्ष जयंत पाटील यांनी सांगितले की, सध्या मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींच्या (पान २ वर)

## थोडक्यात

### पारस डोगराने घडवला इतिहास

**मुंबई ।** जम्मू-काश्मीर संघाचा कर्णधार पारस डोगराने सोमवारी रणजी करंडक स्पर्धेत ऐतिहासिक विक्रम नावावर केला. देशातल्या सगळयात प्रतिष्ठेच्या रणजी करंडक स्पर्धेत १० हजार धावांचा टप्पा ओलांडणारा पारस केवळ दुसरा खेळाडू ठरला आहे. जम्मू काश्मीर आणि बंगाल यांच्यातील रणजी करंडक स्पर्धेच्या सेमी फायनलच्या लढतीत पारसने हा विक्रम नावावर केला. रणजी स्पर्धेत १० हजार धावा करणारा वासिम जाफर १४७व्या डावात पारसने हा विक्रम नोंदवला.

### स्मार्ट मीटर बसविण्यात महाराष्ट्र देशात प्रथम

**जळगाव।** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यात ऊर्जा परिवर्तन चालू आहे. सौर कृषी पंप बसविण्यासह विविध बाबतीत महाराष्ट्राने देशात ऊर्जा क्षेत्रात प्रथम क्रमांक मिळविला आहे. आता स्मार्ट मीटर बसविण्यातही महाराष्ट्र राज्य पहिल्या क्रमांकावर आले आहे. शंभर टक्के अचूक बिल, ग्राहकांना दर तासाला मोबाईलवर विजेचा वापर समजण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

# अजित पवारांच्या निधनानंतर ७५ फाईल्स केल्या घाईघाईने मंजूर

## अल्पसंख्याक विभागाकडून ७५ शिक्षण संस्थांना घाईघाईने दिला अल्पसंख्यांक दर्जा

वृत्तसंस्था । मुंबई

**अजित पवार यांच्या निधनानंतर मंत्रालयातील खळबळजनक प्रकार समोर आला आहे. अल्पसंख्याक विभागाकडून ७५ शिक्षण संस्थांना घाईघाईने अल्पसंख्यांक दर्जा देण्यात आला आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर राज्यात शासकीय दुखवट्याचे वातावरण असतानाच अवघ्या काही तासांतच ही प्रमाणपत्रे देण्यास सुरुवात झाल्याचे उघड झाले आहे.**

मागील वर्षी ऑगस्ट महिन्यापासून अल्पसंख्यांक दर्जाची प्रमाणपत्रे देण्यास स्थगिती देण्यात आली होती. मात्र, अजित पवार यांच्या निधनानंतर ही स्थगिती डावलून मंत्रालयातील अधिकाऱ्यांकडून प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आल्याचा आरोप केला जात आहे. एखाद्या शाळेला अल्पसंख्याक दर्जा मिळाल्यानंतर त्यांना शिक्षक भरतीत टीईटी लागू होत नाही. या शाळांवर आरटीई कायदा लागू होत नाही.



याशिवाय कोट्यवधी रुपयांच्या देणग्या व अनुदान घेण्याची मुभा मिळते. माणिकराव कोकाटे यांनी १२ ऑक्टोबरला आदेश दिले होते. या प्रमाणपत्रांना स्थगिती दिली होती. त्यानंतर कोकाटेंच्या राजीनाम्यानंतर हा विभाग अजितदादांकडे होता.


मात्र असंवेदनशील अधिकाऱ्यांनी अजितदादांच्या निधनानंतर लगेच ही प्रमाणपत्रे देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे आम्ही हा प्रकार उघडकीस आणला आहे. या निर्णयामागे आर्थिक हितसंबंध आहेत. एकटा अधिकारी हे करू शकत नाही. यामागे संपूर्ण नेटवर्क असेल. या अधिकाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे, अशी मागणी अक्षय जैन यांनी मुख्यमंत्री फडणवीसांकडे केली आहे. अजित पवारांचं विमान अपघाती निधन झाल्यानंतर त्याचदिवशी मंत्रालयात ३ वाजून ९ मिनिटांनी पहिले प्रमाणपत्र जारी करण्यात आले.

### ➤ येथे चालतो व्यापार

**अल्पसंख्याक शाळांमध्ये आपल्याच कुटुंबातील लोकांना नोकरी देऊन सरकारचा पैसा खाल्ला जातो. याबाबत मागे आम्ही तक्रार केली होती. जेवढ्या अल्पसंख्याक दर्जाच्या शाळा आहेत तिथे फक्त व्यापार चालतो, विद्यार्थ्यांना शिकवले जात नाही. त्यामुळे मंत्रालयातील या प्रकाराचा तपास करून जो कुणी यात दोषी आहे त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जातील, असा इशारा राज्य अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान यांनी दिला.**

# अमेरिकेकडून भारताच्या 'ऑपरेशन सिंदूर'चे कौतुक ; ॲडमिरलच्या शब्दांनी पाकचा संताप

प्रतिनिधी । वॉशिंग्टन





**अमेरिकेच्या इंडो-पॅसिफिक कमांडचे कमांडर ॲडमिरल सॅम्युअल जे. पापारो यांनी भारताच्या ऑपरेशन सिंदूरचे तोंडभरून कौतुक केले आहे. त्यांच्या या कौतुकाने आता पाकिस्तानचा तिळपापड झाला असल्याची माहिती समोर येत आहे.**

पापरो यांनी भारताच्या ऑपरेशन सिंदूरविषयी बोलताना, ऑपरेशन सिंदूरचा उल्लेख केल्याने भारताचे कौतुक होते, कारण भारतीय सैन्याने उल्लेखनीय संयम, धोरणात्मक अचूकता आणि सामर्थ्याद्वारे शांतता राखण्याचे प्रदर्शन केलेफ्र असे म्हटले आहे.हे विधान इंडो-पॅसिफिक प्रदेशात वाढत्या आक्रमकता आणि जबरदस्तीबद्दल वाढत्या चिंतेच्या वेळी आले आहे. भारत-अमेरिका संरक्षण भागीदारीला नवीन उंचीवर नेण्याचे आवाहन केले आहे. **संयम कौतुकास्पद :** 'आम्ही दाखवलेल्या संयमाचे कौतुक करतो'. अशा कारवाया सर्व शांतताप्रेमी राष्ट्रांना चिंता करतात. त्यांनी भारताच्या रणनीतिक अंमलबजावणी आणि आत्मनिरीक्षणाचे देखील कौतुक केले, ज्याने ऑपरेशननंतर धडे शिकण्यावर गंभीर लक्ष केंद्रित केले.पाकिस्तानने चिनी मूळच्या शस्त्रांचा (क्षेपणास्त्रे, मार्गदर्शन प्रणाली) वापर केल्याबद्दल, त्यांनी सांगितले की महत्त्वाचे धडे शिकले आहेत. त्यामुळे लांब पल्ल्याच्या क्षेपणास्त्रावर लक्ष केंद्रित करायला वाव मिळणार आहे.

# पोलीस निरीक्षकाच्या रायटरने घेतली १४ लाखांची लाच

## छत्रपती संभाजीनगरात पोलीस निरीक्षकावर कारवाई, रायटर निलंबित



वृत्तसंस्था छ.संभाजीनगर

**राज्याच्या पोलीस दलाची प्रतिमा मलीन करणारी एक अत्यंत धक्कादायक घटना छत्रपती संभाजीनगर शहरातून समोर आली आहे. शहरातील ऐतिहासिक लेणी परिसरात सुरू असलेल्या अवैध उत्खननावर कारवाई टाळण्यासाठी तब्बल १४ लाख रुपयांची लाच पोलिस निरीक्षकाच्या रायटरने स्वीकारल्याचा दावा करणारा एक व्हिडिओ सोशल मीडियावर तुफ ान व्हायरल होत आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलीस प्रशासनाने तातडीने रायटरला निलंबीत के ल्याची घटना घडली असून निरीक्षकावर केवळ कारवाई केल्याचे समजते.**

### ➤ प्रशासनाकडून कारवाई

या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलीस आयुक्तांनी तातडीने पावले उचलली आहेत. व्हिडिओमध्ये दिसत असलेल्या संबंधित पोलीस कर्मचाऱ्याला तत्काळ निलंबित करण्यात आले आहे. तसेच, या प्रकरणाशी नाव जोडले गेलेल्या पोलीस निरीक्षकाची तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. या घटनेची सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले असून, दोषींवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असे संकेत प्रशासनाने दिले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, छत्रपती संभाजीनगरच्या लेणी परिसरात गेल्या काही दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर अवैध उत्खनन सुरू असल्याच्या तक्रारी होत्या. या बेकायदेशीर कामावर डोळेझाक करण्यासाठी आणि (पान २ वर)

# हेलिकॉप्टरचा हवेत तोल गेला मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री बचावले

वृत्तसंस्था । भोपाळ

मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव खंडवा जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना त्यांचे हेलिकॉप्टर हवेत असंतुलित झाल्याची घटना घडली. सुदैवाने मुख्यमंत्री यादव यांना कोणतीही दुखापत झाली नसून ते थोडक्यात बचावले.

पंधाना येथे राज्यस्तरीय 'लाडली बहिण योजनेचा' कार्यक्रम आटोपल्यानंतर मुख्यमंत्री भोपाळकडे रवाना होत असताना हेलिकॉप्टर हवेतच काही सेकंदांसाठी असंतुलित झाल्याचे दृश्य दिसून आले. या घटनेमुळे उपस्थितांची काहीकाळ श्वास रोखला गेला.उड्डाणानंतर हेलिकॉप्टर पुढे जाण्याऐवजी काहीक्षण मागील दिशेने सरकत असल्याचे दिसून आले. त्यामुळे हेलीपॅड परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. पायलटने समयसूचकता दाखवत भोपाळला हेलिकॉप्टर लॅंड केले.

# ब्लॅक बॉक्समधील डेटा बाहेर काढण्यासाठी तो परदेशात पाठवण्याची शक्यता

## • अजितदादांच्या विमान अपघाताचे गूढ कायम



वृत्तसंस्था । मुंबई

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाला पंधरा दिवस होऊन गेले आहेत. अजित पवार यांच्या विमानाला नेमका कोणत्या कारणामुळे अपघात झाला, याचा शोध घेतला जात आहे. या अपघाताचा तपास डीजीसीए आणि एएआयबीकडून सुरु आहे. पण अद्याप तरी अपघाताचं कारण पुढे येऊ शकलेलं नाही. अपघाताच्या तपासात मोठा अडथळा आला आहे.**

त्यामुळे अपघाताचं कारण समोर येण्यास विलंब लागण्याची शक्यता आहे. अजित पवार यांच्या विमानाला २८ जानेवारीच्या सकाळी पावणे नऊच्या सुमारास अपघात झाला. त्यावेळी अजित पवार मुंबईहून पुण्याला जात होते. बारामतीच्या धावपट्टीपासून ५० मीटर अंतरावर त्यांचं विमान कोसळलं. भीषण अपघातात विमानातील सर्वांचा मृत्यू झाला. या विमानात अजित पवारांसह एकूण पाच जण होते. अपघातानंतर विमानाला आग लागली. त्यानंतर मोठा स्फोट झाला. या स्फोटाचा व्हिडीओ दोनच दिवसांपूर्वी समोर आला. अजित पवार व्हिएसआर व्हेंचर्स कंपनीच्या विमानातून प्रवास करत होते. अपघातानंतर विमानाचा ब्लॅक बॉक्स (पान २ वर)

### ➤ ब्लॅक बॉक्स जळाल्याने आले अडथळे

**एएआयबीकडून विमान अपघातामागील कारणांचा शोध घेतला जात आहे. अजित पवार प्रवास करत असलेल्या विमानातील ब्लॅक बॉक्स जळालेल्या स्थितीत सापडला आहे. त्यामुळे त्यातील डेटा रिकव्हर करण्यात अडथळे येत आहेत. जित पवार लियारजेट विमानातून प्रवास करत होते. या विमानाची निर्मिती अमेरिकेत झालेली आहे. त्यामुळे या विमानाचा ब्लॅक बॉक्स अमेरिकेला पाठवला जाईल. त्यातील डेटा रिकव्हर करण्यासाठी कंपनीची मदत घेतली जाईल. ब्लॅक बॉक्स परदेशात पाठवण्याबद्दलचा निर्णय येत्या १ ते २ दिवसांत घेतला जाणार आहे.**

# लग्नात सप्तपदी झाली नाही, तरी ते लग्न अवैध ठरत नाही

## दिल्ली उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**लग्नात केवळ सप्तपदीचा विधी झाला नाही, म्हणून ते लग्न अवैध ठरत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा दिल्ली उच्च न्यायालयाने दिला आहे. कोर्टाने नमूद केलंय की जोडप्याने काही विधी पार पाडल्यानंतर एकत्र राहण्यास सुरुवात केली आणि त्यांच्या विवाहातून एक अपत्य जन्माला आले असेल तर ते लग्न अवैध ठरवता येणार नाही.**

कौटुंबिक न्यायालयाने २७ ऑगस्ट २०२५ रोजी न्यायमूर्ती अनिल क्षेत्रपाल आणि न्यायमूर्ती हरीश वैद्यनाथन शंकर यांच्या खंडपीठाने वरील याचिका फेटाळून लावली होती. त्यामुळे या प्रकरणातील पतीने दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली. याचिकाकर्त्याने विवाहाच्या अनेक विधींमध्ये गैरहजर राहिल्याचा युक्तिवाद करून हे लग्न रद्दबातल करण्याची मागणी केली. मात्र, तोंडी आणि कागदोपत्री पुराव्याच्या आधारे कौटुंबिक न्यायालयने हा दावा निराधार ठरवून याचिका फेटाळून लावली होती.

**हिंदू विवाह कायदा काय सांगतो?**

दरम्यान, उच्च न्यायालयाने हिंदू विवाह कायदा १९५५ च्या कलम ७ अंतर्गत वैधानिक योजनेचे विश्लेषण केले गले. कलम ७ मधील उपकलम



१ नुसार, कोणत्याही विशिष्ट समारंभाचे बंधन न घालता कोणत्याही पक्षाच्या रीतिरिवाजानुसार आणि समारंभानुसार विवाह करण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. तसंच, उप कलम २ नुसार, वैध विवाह स्थापित करण्यासाठी प्रत्येकवेळी सप्तपदी करणे अपरिहार्य नाही. म्हणजेच सप्तपदी हा पारंपरिक संस्कारांचा एक भाग आहे. पण हा विधी बंधनकारक नाही, असं नमूद करण्यात आलं.याचिकाकर्त्याचे १९ जून २०१६ मध्ये एकमेकांना हार घालून लग्न झाले. परंतु, यावेळी त्यांच्या लग्नसोहळ्यात सप्तपदी हा विधी झाला नाही. त्यानंतर हे जोडपं (पान २ वर)

# संपादकीय

## सौंदाळा गावाचा आदर्श वस्तुपाठ

महाराष्ट्राच्या व्यासपीठावर एकीकडे जातीय संघर्ष मोठ्या प्रमाणात तीव्रपणे समोर येत असताना सौंदाळा गावाने नुकत्याच झालेल्या ग्रामसभेमध्ये आपले गाव जातीमुक्त करण्याचा निर्णय जाहीर केला आहे. या छोट्या गावाने घालून दिलेला आदर्श केवळ इतर गावांनी नव्हे तर सर्वच राजकीय पक्षांनी अनुकरण करावा असा आहे. राजकीय नेते धार्मिक, जातीय राजकारण करतात हे महाराष्ट्राला काही नवीन नाही. याच पार्श्वभूमीवर सौंदाळा गावाचा हा आदर्श अत्यंत महत्त्वाचा आहे. सरकारी पातळीवर दरवर्षी आदर्श गावांची घोषणा होत असली तरी त्यामध्ये समावेश झालेली गावे खऱ्या अर्थाने आदर्श असतातच असेही नाही; पण सौंदाळा नावाच्या या छोट्या गावाने गेल्या काही वर्षांमध्ये सातत्याने आदर्श अनुकरणीय उपक्रम राबवत आपण खऱ्या अर्थाने आदर्श आहोत हे लक्षात आणून दिले आहे. नवीन पिढीला आणि एकूण सामाजिक वातावरण खराब करणाऱ्या सोशल मीडियाला या गावामध्ये स्थान नाही. गावात ठराविक कालावधीमध्ये मोबाइलचा वापर संपूर्णपणे बंद ठेवला जातो. शिवाय गावामध्ये बालविवाह लावले जात नाहीत आणि विधवा विवाहाला प्रोत्साहन दिले जाते. गावामध्ये सकाळी दररोज राष्ट्रगीत लावले जाते आणि स्पीकरवरून हे राष्ट्रगीत प्रसारित होत असताना सर्वजण त्याला मानवंदना देतात. अशा प्रकारचे अनेक आदर्श उपक्रम राबवून या छोट्या गावाने आपला ठसा उमटवला आहे. पण या गावाचे उदाहरण देत असतानाच सर्वांनीच त्याचे अनुकरण करण्याची गरज आहे, हे मात्र अनेकांच्या लक्षात येत नाही. गेल्या काही दिवसांमध्ये एकीकडे सौंदाळा गावाच्या आदर्श उपक्रमांची चर्चा होत असतानाच दुसरीकडे विविध राजकीय पक्षांचे नेते देवांच्या व महापुरुषांच्या प्रतिमा, पुतळे आणि त्यानिमित्ताने होणारा धार्मिक–जातीय संघर्ष यावरच लक्ष केंद्रित करत होते. राजकीय पक्ष आणि त्यांचे नेतेच अद्याप जातीमुक्त झाले नसल्याने विविध जातींमध्ये महापुरुषांची विभागणी करण्याचे अनिष्ठ काम त्यांनी केले आहे आणि मग तुमचा महापुरुष श्रेष्ठ की आमचा श्रेष्ठ या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील सामाजिक समरसताच विस्कटून गेली आहे. कोणताही महापुरुष हा कोणत्याही विशिष्ट जातीचा किंवा धर्माचा नसतो तर, संपूर्ण समाजाचा असतो याचा विसर जाणीवपूर्वक पडावा यासाठी तेवढ्याच जाणीवपूर्वकपणे प्रयत्न केले जात आहेत. महापुरुषांची जात पाहूनच त्याचे श्रेष्ठत्व किंवा कनिष्ठत्व ठरवण्याची अनुचित पद्धत महाराष्ट्रामध्ये विकसित होऊ लागली आहे. एखादा महापुरुष विशिष्ट जातीचा आहे म्हणजे तो चांगला आहे किंवा वाईट आहे असेच ठरवण्याकडे कल वाढत आहे. महापुरुषांना अशा प्रकारे एकाच जातीमध्ये गुंतवून ठेवण्याचे राजकारण होत असण्याच्या पार्श्वभूमीवर सौंदाळा गावाने स्वतःला जातीमुक्त करण्याचा घेतलेला निर्णय अत्यंत ठळकपणे उठून दिसत आहे. जातीमुक्त समाजाचे स्वप्न पाहणारे घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाराष्ट्रातच दुर्दैवाने गेल्या काही वर्षांमध्ये जातीय अस्मितांचा संघर्ष प्रचंड प्रमाणात वाढला आहे आणि राजकारणी लोक त्याला आपल्या फायद्यासाठी खत पाणीही घालत आहेत. सामाजिक वातावरण कलुषित करण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात आहेत. त्यात सोशल मीडियावरील तथाकथित तज्ज्ञ आणि इन्फ्लूएन्सर्स आपल्या फायद्यासाठी कोणत्याही प्रकारची चुकीची मांडणी करून लोकांची माथी भडकवण्याचे काम करत आहेत. या सर्व परिस्थितीमधून कशा प्रकारे बाहेर पडायचे याबाबत कोणाच्या मनात संभ्रम असेल तर त्याचे उत्तर सौंदाळा नावाच्या या छोट्या गावाने दिले आहे. जातीमुक्त समाज सामाजिक वातावरण स्वच्छ आणि निखळ करू शकेल असा संदेश या छोट्या गावाने दिला आहे. भारतीय घटनेने प्रत्येकाला आपल्या धर्माचे आणि जातीचे पालन करण्याचे स्वातंत्र्य दिले असले, तरी हे करत असताना इतर धर्माला किंवा जातीला कमी लेखण्याचे कोणतेही कारण नसते. आपली स्वतःची धार्मिक किंवा जातीय अस्मिता कायम ठेवून इतर धर्म आणि जातींचे अस्तित्व मान्य करणे महत्त्वाचे असते. सौंदाळा गावाने आपल्या छोट्याशा निर्णयातून हेच सिद्ध करून दाखवले आहे.

# मस्जिद परिचयातून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश

## वरणगावात सामाजिक सलोखा अन् बंधुभाव वृद्धिंगताचे घडविले दर्शन

प्रतिनिधी । वरणगाव, ता. भुसावळ

**अक्सानगर परिसरातील मस्जिदमध्ये राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने आयोजित मस्जिद परिचय व राष्ट्रीय एकात्मता संदेश कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध धर्मीय नागरिकांच्या उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमातून एकतेचा आणि परस्पर आदराचा प्रेरणादायी संदेश देण्यात आला.**



कार्यक्रमाच्या प्रारंभी निमंत्रित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर मस्जिदचा इतिहास, रचना, तसेच तिची सामाजिक आणि आध्यात्मिक भूमिका यांचा सविस्तर परिचय करून देण्यात आला. अजानचा अर्थ स्पष्ट करताना ती केवळ नमाजची हाक नसून मानवतेकडे, सदाचाराकडे आणि ईश्वरभक्तीकडे बोलावणारा संदेश असल्याचे सांगण्यात आले. प्रेषित पैगंबर साहेबांचे जीवनकार्य हे मानवतेच्या कल्याणासाठी आदर्श असल्याचे नमूद करण्यात आले. तसेच पवित्र कुरआन हा संपूर्ण मानवजातीसाठी मार्गदर्शक ग्रंथ असून त्यातून समता, समानता, न्याय, करुणा आणि बंधुभाव यांचा संदेश दिला जातो, असे प्रतिपादन करण्यात आले. राष्ट्रप्रेम, संविधानिक मूल्यांचा सन्मान आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव यांची जोपासना प्रत्येक नागरिकाने करावी, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुस्तफा साहेब जळगाव यांनी प्रभावीपणे केले. समस्त मस्जिद व्यवस्थापक समितीच्यावतीने उपस्थित मान्यवरांचे व नागरिकांचे आभार व्यक्त करण्यात आले. या कार्यक्रमास विविध सामाजिक व राजकीय पदाधिकारी, मान्यवर नागरिक तसेच हिंदू बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकमेकांना शुभेच्छा देत सौहार्दाचे वातावरण निर्माण केले. या उपक्रमामुळे वरणगावात सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि राष्ट्रीय एकात्मतेचा प्रेरणादायी संदेश दृढ झाला आहे.

### ➤ एकता हीच भारताची खरी ताकद

**कार्यक्रमात ॲड.अफजल गाझी (अकोला) आणि मौलाना महम्मद इस्माईल कासमी (लातूर) यांनी मार्गदर्शन करत धर्मांतर, सौहार्द, सामाजिक ऐक्य आणि शांततेचे महत्त्व अधोरेखित केले. विविधतेत एकता हीच भारताची खरी ताकद असून परस्पर संवादातून गैरसमज दूर होतात, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.**

# भारतीय नृत्य परंपरा जगात अद्वितीय : डॉ. रुपाली देसाई



प्रतिनिधी । चोपडा

**जगभरातील प्रयोगनिष्ठ कलांमध्ये भारतीय नृत्य परंपरेचे स्थान अद्वितीय आहे. गुरुकडून शिष्याकडे जाणाऱ्या ज्ञान व कौशल्याच्या प्रवाहातून या कलेची जपणूक आणि संवर्धन झाले आहे. अभिनयासह नृत्य सादरीकरण होणाऱ्या कथ्थक या कलेच्या माध्यमातून देशाचा भव्य सांस्कृतिक इतिहास आणि काव्य जपली गेली आहेत. अभ्यासासोबतच कलांची उपासना करुन संस्कृती संवर्धनास हातभार लावता येईल, असे मत मुंबई येथील बनारस घराण्यांच्या सुप्रसिद्ध कथ्थक नृत्यांगना, अभिनेत्री तथा कथ्थक गुरु डॉ. रुपाली देसाई यांनी व्यक्त केले.**

शिरपूर येथील स्पीकमॅके क्लबतर्फे डॉ. रुपाली देसाई यांच्या नृत्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. स्पीकमॅके क्लबच्या अध्यक्षा तथा माजी नगराध्यक्षा जयश्रीबेन पटेल, एनएमआयएमएस शिरपूर कॅम्पस प्रभारी रिटा पटेल, स्पीकमॅके क्लबचे उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, उपाध्यक्षा रेशा पटेल,सचिव डॉ.उमेश शर्मा, कोषाध्यक्षा डॉ.अमृता भंडारी, सहकोषाध्यक्षा मीनाक्षी राठी, डॉ. आशीष अग्रवाल, प्रीतम पाटील उपस्थित होते. शिरपुरातील विविध शाळा, महाविद्यालयांसाठी डॉ. रुपाली देसाई यांनी कार्यशाळा घेतल्या. शास्त्रानुसार नर्तन भेदाचे विश्लेषण, प्रस्तुतीकरण, अभिनयभेदाची ओळख, मुद्रा, नवरस आदिंबाबत त्यांनी प्रात्यक्षिकांसह माहिती दिली. कथ्थक नृत्य शैलीतील श्रीगणेशाचे अधिष्ठान संदर्भातील गणेश वंदना विशेष दाद मिळवून गेली. तालांगात झपतालाची प्रस्तुती करताना कथ्थकच्या नृत्यातील भ्रमरी, बंदिशीचे सादरीकरण करतांनाच चक्कर, हस्तक, मुद्रा, प्राथमिक लयकरी, देवतांवर आधारित श्लोक याचे धडेही त्यांनी दिले.

# नवापूर येथे शोभायात्रा उत्साहात

प्रतिनिधी । नवापूर

श्री नागेश्वर महादेव मंदिर येथे महाशिवरात्रीनिमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांना भाविकांचा प्रतिसाद लाभला. श्री शिवजी महाभिषेक, धर्मध्वज रोपण, महाआरती, सत्यनारायण महापूजा व कथा, रुद्र वाटप, शिवजी शृंगार दर्शन व महाआरती तसेच महाप्रसाद वाटप असे विविध कार्यक्रम पार पडले. सायंकाळी शोभायात्रा काढण्यात आली.

ही शोभायात्रा श्रीराम मंदिर येथून प्रारंभ होऊन लाईट बाजार, सराफ गल्ली, श्रीराम मंदिर गल्ली मार्गे श्री नागेश्वर महादेव मंदिर येथे सांगता करण्यात आली. या शोभायात्रेत देवमोगरा माता, भारत माता, लहान गोपाळ मंडळी यांच्या वतीने श्री शंकर भगवान व पार्वती मातेचा जिवंत देखावा सादर करण्यात आला. या देखाव्यामुळे भाविकांमध्ये भक्तिभाव व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले तसेच शोभायात्रेत आदिवासी ढोलाच्या गजरात पारंपरिक आदिवासी नृत्य सादर करण्यात आले. या नृत्यप्रकाराने उपस्थित भाविकांचे लक्ष वेधून घेतले. शोभायात्रा समाप्तीनंतर श्री नागेश्वर महादेव मंदिरात विधीवत पूजन व महाआरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थित भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात आले. महाशिवरात्रीनिमित्त शहरात दिवसभर धार्मिक व भक्तिमय वातावरण होते.

# शिवमंदिरांमध्ये हर हर महादेवचा गुंजला गजर

प्रतिनिधी । धुळे

**महाशिवरात्रीनिमित्त शहरातील शिवमंदिरामध्ये आज पहाटेपासूनच भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. यावेळी भाविकांनी हर हर महादेव, बम बम भोलेचा गरज करीत नतमस्तक झाले. विविध धार्मिक कार्यक्रम व भाविकांच्या गर्दीमुळे मंदिर परिसरात चैतन्याच्या वातावरण निर्माण झाले होते. भाविकांना ठिकठिकाणी प्रसादाचे वाटप करण्यात आले.**





महाशिवरात्रीनिमित्त शहरातील पुरातन श्री पांझरापोळ महादेव, श्री गुप्तेश्वर महादेव, श्री नागेश्वर महादेव, जमनागिरीतील महादेव मंदिर, कुमार नगरातील महादेव मंदिर येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे मंदिरामध्ये महाअभिषेक करण्यात आला. मंदिरांमध्ये सकाळपासून दर्शनासाठी भाविकांची रांग लागली होती. भाविकांनी शिवलिंगावर बेलपत्र, दूध, दही, तूप, मध, साखरमिश्रित पंचामृत अर्पण करीत जलधारांनी अभिषेक केला. महाशिवरात्रीनिमित्त मंदिरांना आकर्षक फुले, भगव्या पताकांनी सजविण्यात आले होते. तसेच मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. ठिकठिकाणी भाविकांना साबुदाणा खिचडी, फळे व उपवासाचे पदार्थाचे वाटप करण्यात आले. शहरातील आग्रा रोडवरील फुलवाला चौकात पुरातन श्री गुप्तेश्वर महादेव मंदिर असून या मंदिरात महाभिषेक करण्यात आला.

# मोबदला न देता काम सुरु केल्याने विसरवाडी-नंदुरबार महामार्गाचे काम शेतकऱ्यांनी पाडले बंद

प्रतिनिधी । नवापूर

**तालुक्यातील वाटवी गावाजवळ सुरू असलेल्या विसरवाडी–नंदुरबार राष्ट्रीय महामार्गाच्या कामास आज शेतकऱ्यांनी तीव्र विरोध करत काम बंद पाडले. जमिनींचे कायदेशीर संपादन न करता तसेच कोणताही मोबदला न देता ठेकेदाराने थेट शेतजमिनीत काम सुरू केल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.**



शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, त्यांच्या जमिनींचे सातबारा उतारे स्पष्ट असतानाही कोणतीही पूर्वसूचना, नोटीस किंवा भरपाई न देता यंत्रसामग्री शेतात आणून महामार्गाचे काम सुरू करण्यात आले. त्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी कामाच्या ठिकाणी दाखल झाले व ठेकेदाराचे काम तातडीने थांबविण्यात आले. आमच्या जमिनींचा योग्य दराने मोबदला द्या, कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करा आणि त्यानंतरच काम सुरू करा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला. यासंदर्भात शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, तहसीलदार तसेच स्थानिक आमदार यांना लेखी निवेदन दिले आहे. जोपर्यंत योग्य मोबदला अदा मिळत नाही, तोपर्यंत महामार्गाचे काम सुरू होऊ देणार नाही, असा ठाम पवित्रा शेतकऱ्यांनी घेतला आहे.

# पान १ वरुन

**पोलीस निरीक्षकाच्या रायटरने ......**

संबंधित माफियावर कारवाई न करण्यासाठी एका पोलीस निरीक्षकाने आपल्या रायटरच्या माध्यमातून १४ लाख रुपयांची मागणी केल्याचा गंभीर आरोप केला जात आहे. व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये एक व्यक्ती नोटांच्या मोठ्या थप्प्या मोजताना स्पष्टपणे दिसत असून, ही व्यक्ती पोलीस कर्मचारी असल्याचा दावा केला जात आहे.

**राज्यभरातील सर्व ग्रामपंचायती......**

तुलनेत शासकीय कोट्यातील मनुष्यबळ अपुरे आहे. एका प्रशासकाकडे किमान पाच ते कमाल २० पेक्षा अधिक गावांचा कारभार सोपवावा लागत आहे. इतका मोठा कार्यभार सांभाळताना गावांना योग्य न्याय मिळण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळे ग्रामपातळीवर लोकप्रतिनिधींची सक्रिय भूमिका अत्यावश्यक आहे.

**लॅक बॉक्समधील डेटा.....**

हाती लागला. पण तो जळालेल्या अवस्थेत होता. त्यामुळे त्यातील डेटा रिकव्हर करण्यात अडचणी येत आहेत. ब्लॅक बॉक्समधील डेटा बाहेर काढण्यासाठी तो परदेशात पाठवला जाण्याची दाट शक्यता आहे. याबद्दलचा निर्णय १ ते २ दिवसांत घेतला जाऊ शकतो. तशी माहिती केंद्रीय विमान उड्डाण प्रशासनातील सुत्रांनी दिली आहे.

**लग्नात सप्तपदी झाली......**

एकत्र राहू लागले. त्यांच्या सहजीवनातून त्यांना एक मुलगीही झाली. परंतु, याचिकार्त्याने असा युक्तिवाद केला की ऑक्टोबर २०१६ पासून तो पत्नीबरोबर राहत नव्हता. त्या दोघांमध्ये सप्तपदीचा विधी झाला नसल्याने त्याने पत्नीबरोबर राहण्यास नकार दिला.तर, प्रतिवादी म्हणजे याचिकाकर्त्याच्या पत्नीने दावा केला की ऑक्टोबर २०१७ मध्ये तिला सासरच्या घरातून हाकलून लावण्यात आले. तसंच, लग्नसोहळ्यात सप्तपदी कार्यक्रम झाला असल्याचा दावाही पत्नीने केला. परंतु, या सोहळ्याचे फोटो न्यायालयासमोर ठेवण्यास ती अपयशी ठरली.

**उद्योगांसाठी ‘ओपन ॲक्सेस.....**

समन्वय आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.दरम्यान, ऊर्जा स्वावलंबी आणि विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी शासन, उद्योग, तंत्रज्ञान संस्था, संशोधन केंद्रे आणि शेतकरी यांचा समन्वय आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. मासमासारख्या उद्योग संघटनांची भूमिका धोरणात्मक भागीदार म्हणून अधिक महत्त्वाची ठरणार असल्याचा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. या उद्घाटन कार्यक्रमाला पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, नगरसेविका मंजुषा खेडेकर, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नातू सत्यकी सावरकर, जर्मन इंडो इनोवेशन कॉरिडोरचे संस्थापक उपेंद्र बर्वे, मास्माचे अध्यक्ष अमित कुलकर्णी, उपाध्यक्ष प्रदीप खाडे आणि माजी अध्यक्ष शशिकांत वाकडे उपस्थित होते.

---

# दारूच्या नशेत घरात घुसून प्राणघातक हल्ला

प्रतिनिधी । धुळे

शिरपूर तालुक्यातील पळासनेर (रेंजडयापाडा) येथे मागील भांडणाच्या कारणावरून दारूच्या नशेत घरात घुसून कुटुंबावर धारदार हत्याराने हल्ला करण्यात आला. त्यात दोन जण जखमी झाले असून याप्रकरणी तीन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात एकास अटक करण्यात आली आहे. याबाबत रिंजडिया दुर्गा पावरा (वय ६०, रा. रेंजडयापाडा, पो. पळासनेर, ता. शिरपूर) यांच्या फिर्यादीनुसार, दि.१२ रोजी रात्री ८.३० ते ९ वाजेच्या सुमारास गावातील हाकेश मगन पावरा, राधे जगन पावरा व जगन दुर्गा पावरा यांनी मागील भांडणाच्या कारणावरून दारूच्या नशेत फिर्यादीच्या घरी जाऊन कुऱ्हाड (दातेबाळी), लाकडी दांडा व लोखंडी पाते असलेल्या हत्यारांनी मारहाण केली.

# जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी प्रकाश सरदार

प्रतिनिधी । भुसावळ

निंभोरा बुद्रुक येथे विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा जोतीराव फुले यांच्या संयुक्त जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी प्रकाश सरदार यांची बिनविरोध निवड भुसावळ तालुक्यातील निंभोरा बुद्रुक येथे दरवर्षीप्रमाणे त्रिरत्न बुद्ध विहारात गावातील नागरिक यांनी एकत्रीत येऊन भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर व महात्मा जोतीराव फुले यांच्या संयुक्त जयंती उत्सव समितीची नवीन कार्यकारणी बिनविरोध सर्वानुमते निवड करण्यात आली.

समितीचे अध्यक्ष प्रकाश सरदार, उपाध्यक्षपदी तरुण गवई, सुरज पवार, सचिव दीपक सुरवाडे, आशिष सुरवाडे, सहसचिव राहुल तायडे, कोषाध्यक्ष अजय वाघ, सहकोषाध्यक्ष प्रणव मेश्राम, संघटक अरुण भालेराव, सहसंघटक उल्हास मोरे, प्रसिद्धी प्रमुख रमेश खंडारे, सदस्य विशाल जोहरे, मिलिंद गाढे, सागर नाईक, आनंद सुरडकर, गौरव नरवाडे, सुमेध कांबळे, सुरेश बोदडे, मधुकर चतुर, यश अवचार, संघपाल सोनवणे, चेतन तांबे, चिकू मेश्राम, सल्लागार एन.टी.इंगळे, अरुण दामोदर, राहुल वाघ, मधूकर हातोले, मधुकर बाऱ्हे, बिट्टू बाऱ्हे, रमेश शिरसाठ, चक्रधर यावलकर, ग्राम शाखा महिला अध्यक्ष उषा सुरवाडे, प्रज्ञा खंडारे, करुणा नरवाडे, वैशाली सरदार, चंदा खंडारे, वैशाली जाधव, मंगला सुरवाडे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# बामखेडे महाविद्यालयात व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षणाचा समारोप

प्रतिनिधी । शहादा

**बामखेडा येथील ग्रामविकास संस्थेच्या कला व विज्ञान महाविद्यालय व महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलपमेंट ॲकेडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच पीएम उषा अंतर्गत आयोजित एक आठवड्याचा व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण कार्यक्रम झाला.**



येथील ग्रामविकास संस्थेच्या कला व विज्ञान महाविद्यालय व महाराष्ट्र स्टेट फॅकल्टी डेव्हलपमेंट ॲकेडमी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच पीएम उषा अंतर्गत आयोजित एक आठवड्याचा व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण कार्यक्रम झाला. कार्यक्रमाचा समारोप कवयित्री बहिणबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अधिसभा सदस्या प्राचार्य डॉ. वैशाली पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. डॉ. वैशाली पाटील यांनी सांगितले, नव्या शिक्षण धोरणाच्या पार्श्वभूमीवर प्राध्यापकांचे व्यक्तिमत्व हे केवळ ज्ञानदाते नसून प्रेरणादाते असावे लागते. सातत्याने अद्ययावत राहणे, तंत्रज्ञानस्नेही दृष्टीकोन ठेवणे आणि शैक्षणिक उद्दिष्टांशी बांधिलकी जपणे ही काळाची गरज आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. पाटील यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, या प्रशिक्षणातून घडलेला व्यक्तिमत्व विकास विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीत प्रतिबिंबित झाला पाहिजे. प्राध्यापकांच्या गुणवत्तावृद्धीतूनच संस्थेची गुणवत्ता वृद्धिंगत होते. एमएसएफडीएचे कोर्स समन्वयक शामकांत दौंडकर यांनी अकादमीच्या विविध प्रशिक्षण उपक्रमांची माहिती देत प्राध्यापकांनी अशा कार्यक्रमांत सातत्याने सहभागी व्हावे, असे आवाहन केले. प्रशिक्षणार्थी प्रा.डॉ.व्ही.एम. पाटील, प्रा.डॉ. अजय शर्मा, प्रा.सौ. जाधव यांनी मनोगतातून प्रशिक्षणामुळे आत्मविश्वास, अध्यापन कौशल्य आणि शैक्षणिक दृष्टीकोन अधिक परिपक्व झाल्याचे नमूद केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन समन्वयक प्रा.डॉ.योगेश पाटील यांनी केले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.– ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# मनपात स्थायी, महिला-बालकल्याण समितीवर महायुतीचे वर्चस्व!

## मंत्री गिरीश महाजन यांच्या नेतृत्वाखाली भाजपचा वरचष्मा: आता सभापतीपदाची उत्सुकता

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव महानगरपालिकेतील स्थायी समितीच्या १६ सदस्यांसह महिला व बालकल्याण समितीच्या नऊ सदस्यांची निवड सोमवारी विशेष महासभेत करण्यात आली. पहिल्याच वर्षी तिन्ही प्रमुख पक्षांनी अनुभवी नगरसेवकांना प्राधान्य देत दोन्ही समित्यांची बांधणी केल्याचे चित्र पाहायला मिळाले. अर्थात, दोन्ही समित्यांवर मंत्री गिरीश महाजन यांच्या नेतृत्वाखालील महायुतीचे वर्चस्व दिसून आले.**



महापौर दीपमाला काळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या विशेष महासभेस उपमहापौर मनोज चौधरी, आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांची प्रमुख उपस्थिती होती. सुरुवातीला भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि शिवसेना (ठाकरे गट) यांच्याकडून स्थायी समिती सदस्यांची नावे बंद पाकिटातून सादर करण्यात आली. महापौरांनी सभागृहात या नावांचे वाचन करताच निवड झालेल्या सदस्यांचे टाळ्यांच्या गजरात अभिनंदन करण्यात आले. महापालिका स्थायी समितीत १६ सदस्यीय संख्या असून भाजपचे १०, शिवसेनेचे पाच आणि ठाकरे गटाचा एक सदस्य अशी निवड झाली आहे. भाजपकडून दीपक सूर्यवंशी, नितीन लड्ढा, विशाल भोळे, डॉ. चंद्रशेखर पाटील, सुरेश सोनवणे, अरविंद देशमुख, कल्पेश सोनवणे, मानसी भोईटे, वंदना इंगळे आणि नितीन सपके यांची निवड करण्यात आली. तर शिवसेना शिंदे गटाकडून विष्णू भंगाळे, दिलीप पोकळे, नरेंद्र पाटील, गणेश सोनवणे आणि सागर सोनवणे यांना संधी देण्यात आली. शिवसेना ठाकरे गटाकडून इब्राहिम पटेल यांची निवड झाली. नऊ सदस्यीय महिला व बालकल्याण समितीत भाजपचे पाच, शिवसेनेचे तीन आणि ठाकरे गटाचा एक सदस्य, अशी निवड झाली. भाजपकडून सुरेखा तायडे, रंजना वानखेडे, पूजा जगताप, विद्या सोनवणे आणि गायत्री राणे यांची निवड करण्यात आली. शिवसेना शिंदे गटाकडून सिंधू कोल्हे, प्रतिभा देशमुख आणि डॉ.अमृता सोनवणे यांना संधी देण्यात आली. तर शिवसेना ठाकरे गटाकडून हिनाबी शाकीर खान यांची निवड जाहीर करण्यात आली. या सर्व सदस्यांचे सभागृहात अभिनंदन करण्यात आले.

### ➤ राजकीय हालचालींना वेग

स्थायी आणि महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांची निवड पूर्ण झाल्यानंतर आता सर्वांचे लक्ष सभापतीपदाच्या निवडीकडे लागले आहे. सभापतीपदाची अधिकृत निवड प्रक्रिया विभागीय आयुक्त कार्यालयात पार पडणार असल्याने पुढील काही दिवसांत राजकीय हालचालींना वेग येण्याची शक्यता आहे. विविध पक्षांमध्ये अंतर्गत चर्चा, संभाव्य उमेदवारांची चाचपणी आणि समन्वय बैठका यांना सुरुवात होणार असल्याचे संकेत आहेत. स्थायी समिती ही महानगरपालिकेच्या कारभारातील अत्यंत महत्त्वाची समिती मानली जाते. आर्थिक तरतुदी, विकासकामांना मंजुरी, खर्चाचे नियोजन आणि विविध प्रस्तावांना अंतिम स्वरूप देण्याची जबाबदारी या समितीवर असते. त्यामुळे सभापतीपद कोणाकडे जाते, याला विशेष महत्त्व आहे. सत्ताधारी पक्षाकडून अनुभवी व प्रशासकीय कामकाजाची जाण असलेल्या सदस्याला संधी दिली जाईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

# मार्चपर्यंत प्लास्टिक विक्री बंद करा; अन्यथा गुन्हे दाखल होणार : महापौर

प्रतिनिधी । धरणगाव

**शहराला प्लास्टिकमुक्त करण्याच्या उद्देशाने जळगाव महानगरपालिकेने आता कठोर पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. महापौर दीपमाला काळे यांनी प्लास्टिक विक्रेत्यांची तातडीची बैठक घेऊन १ मार्चपर्यंत शहरात प्लास्टिकची विक्री पूर्णपणे बंद करण्याचे निर्देश दिले आहेत. निर्धारित मुदतीनंतर प्लास्टिक साठा किंवा विक्री आढळल्यास संबंधितांवर २५ हजार रुपयांपर्यंत दंड आकारला जाणार असून, आवश्यकतेनुसार गुन्हेही दाखल करण्यात येतील, असा स्पष्ट इशारा प्रशासनाने दिला आहे.**

सोमवार, १६ फेब्रुवारी रोजी महापौर दालनात पार पडलेल्या या बैठकीस उपमहापौर मनोज चौधरी, सहायक आयुक्त (आरोग्य) उदय पाटील, वरिष्ठ आरोग्य अधीक्षक रमेश कांबळे, प्लास्टिक विक्रेता असोसिएशनचे अध्यक्ष कमल शामनानी, धनराज चावला, डॉ. लीना पाटील तसेच ‌झमाझे शहर माझी जबाबदारीफ उपक्रमातील सदस्य उपस्थित होते. यावेळी उपमहापौर मनोज चौधरी यांनी प्लास्टिकमुळे पर्यावरणासह मानवी आरोग्यावर होणाऱ्या गंभीर परिणामांवर प्रकाश टाकला. कॅन्सर, दमा यांसारख्या आजारांचे प्रमाण वाढत असून, प्राण्यांच्या पोटात प्लास्टिक आढळण्याच्या घटना चिंताजनक असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्लास्टिकचा वापर थांबविण्यासाठी व्यापाऱ्यांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. महापौर दीपमाला काळे यांनी सांगितले की, व्यापाऱ्यांना प्लास्टिकचा साठा हटविण्यासाठी १ मार्चपर्यंतची अंतिम मुदत देण्यात येत आहे. त्यानंतर कोणतीही पूर्वसूचना न देता थेट दंडात्मक कारवाई केली जाईल. प्लास्टिकऐवजी कंपोस्टेबल बॅग्स, कापडी पिशव्या व पर्यावरणपूरक पर्यायांचा वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले. महिला बचत गटांकडून कापडी पिशव्या खरेदी केल्यास पर्यावरण संवर्धनासोबतच स्थानिक महिलांना रोजगाराच्या संधीही उपलब्ध होतील, असेही त्यांनी नमूद केले. बैठकीत डॉ. लीना पाटील यांनी पर्यावरणपूरक पिशव्या व पर्यायी साहित्याच्या वापराबाबत सविस्तर माहिती दिली. तसेच शहरात कुठेही प्लास्टिक विक्री होत असल्याचे आढळल्यास नागरिकांनी थेट महापौर किंवा उपमहापौरांकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले.

# साहित्य अभिवाचन स्पर्धेच्या प्रथम फेरीत मुलजी जेठा महाविद्यालयाचा संघ प्रथम

● व.वा.जिल्हा वाचनालय- रंग गंध कलासक्त न्यास यांचा उपक्रम

प्रतिनिधी । जळगाव

**येथील व.वा.जिल्हा वाचनालय आणि रंग गंध कलासक्त न्यास, चाळीसगाव यांच्या संयुक्त विद्यमाने पुज्य पुरुषोत्तम दारव्हेकर स्मृती निमित्त जागतिक मराठी साहित्य अभिवाचन स्पर्धेची प्राथमिक फेरी नुकतीच वाचनालयाच्या रामनारायण अग्रवाल सभागृहात संपन्न झाली.या साहित्य अभिवाचन स्पर्धेत मुलजी जेठा महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या योगेश महाले, डॉ.विलास धनके, प्रा.गोपीचंद धनगर यांच्या संघाने सादर केलेल्या वस्तीत उजेड पेरणारा कवी या संहितेस प्रथम क्रमांक तर सोनप्रिया कलामंचच्या प्रिया देशपांडे, सोनिका मुजुमदार, अनघा गोडबोले यांनी सादर केलेल्या वाटा गेल्या दूर देशी या संहितेने व्दितीय क्रमांक पटकावला.**



या स्पर्धेत एकूण दहा संघ सहभागी झाले होते. अभिवाचन स्पर्धेत सहभागी सर्व संघांना मान्यवरांच्या हस्ते सहभाग प्रमाणपत्र देवून सन्मानीत करण्यात आले. युवकासाठी उदयोन्मुख रंग तारा हे विशेष सन्मानपत्र ओजस्विनी गृपच्या तनुश्री सोनार यांना देण्यात आले. वाचिक अभिनयाची प्रमाणपत्रे प्रथम वॉरियर्स गृपच्या संजय निकुंभ, व्दितीय सावित्री मंचच्या प्रिया सफळे, तृतीय अनुबंध गृपच्या डॉ.महेंद्र शिरुडे, चतुर्थ ब.गो. शानबाग विद्यालयाच्या स्मिता चव्हाण यांना मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली. स्पर्धेस परिक्षक म्हणून चिंतामण पाटील व संदीप केदार यांनी काम पाहिले. स्पर्धेचे समन्वयक म्हणून वाचनालयाचे ग्रंथपाल अनिल अत्रे यांनी काम पाहिले. दोनही परिक्षक व समन्वयक यांना अनुक्रमे वाचनालयाचे कार्याध्यक्ष अनिलकुमार शाह, चिटणीस प्रा.डॉ. शुभदा कुलकर्णी, कोषाध्यक्ष अभिजित देशपांडे यांचे हस्ते स्मृतिचिन्ह व गुलाब पुष्प देवून सन्मानित करण्यात आले. सुरुवातीस स्पर्धेचे उद्घाटन वाचनालयाचे कार्याध्यक्ष अनिलकुमार शाह यांचे हस्ते नटराज पूजन व माल्यार्पण करुन करण्यात आले. स्पर्धेचे उद्घाटक अनिलकुमार शाह यांनी तर परिक्षकातर्फे चिंतामण पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. स्पर्धकातर्फे प्रा.योगेश महाले, अनघा गगडाणी,यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचलन व परिक्षकांचा परिचय वाचनालय महिला समिती सदस्य कविता दीक्षित यांनी करुन दिला. तर पारितोषिक वितरण समारंभाचे सूत्रसंचालन अंजली हांडे यांनी केले. आभार ग्रंथपाल अनिल अत्रे यांनी मानले.

# दगडाने ठेचून प्रौढाची हत्या : दोघांना अटक

प्रतिनिधी । जळगाव

● रामानंद नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**जळगाव शहरात प्रौढाची दगडाने ठेचून हत्या झाल्याचा प्रकार समोर आला आहे. अमर वसंत सपकाळे (वय ५०, रा.खंडेराव नगर, जळगाव) असे खून झालेल्या मयताचे नाव आहे. या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरोधात रामानंद नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.**




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मयत अमर सपकाळे आणि संशयित आरोपी मोहित विजय पाटील आणि कल्पेश सुतार (दोन्ही रा.पिंप्राळा, जळगाव) यांच्यात कुठल्यातरी जुन्या किंवा किरकोळ कारणावरून वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. आरोपींनी रागाच्या भरात जळगाव ते भुसावळ दरम्यान असलेल्या रेल्वे रुळावर अमर सपकाळे यांना गाठले आणि त्यांच्या डोक्यात मोठा दगड घालून त्यांना जिवे ठार मारले. ही घटना १४ फेब्रुवारीच्या रात्री ८ ते १५ फेब्रुवारीच्या सकाळी ८ वाजेच्या दरम्यान घडली.

**दोघा आरोपींना अटक**

रविवार, दि.१५ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता अमर सपकाळे यांचा मृतदेह खंडेराव रेल्वे रूळावर मृतदेह मिळून आल्याने खळबळ उडाली होती. दरम्यान पोलीसांनी पंचनामा करून मृतदेह शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आला होता. याप्रकरणी मयत अमर सपकाळे यांचा मुलगा गिरीश अमर सपकाळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संशयित आरोपी मोहित विजय पाटील आणि कल्पेश सुतार (दोन्ही रा. पिंप्राळा, जळगाव) यांच्या विरोधात रामानंद नगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला व त्यांना अटक करण्यात आली. तपास पोलीस उपनिरीक्षक सचिन रनशिवरे करीत आहे.

## आरोग्य कार्यालयाची महापौरांकडून झाडाझडती

प्रतिनिधी । जळगाव

शहराच्या स्वच्छतेबाबत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असा सज्जड दम देत जळगाव शहर महानगरपालिकेच्या महापौर दीपमाला काळे यांनी आज सोमवारी दि. १६ फेब्रुवारी पहाटे ७ वाजेच्या सुमारास प्रभाग क्रमांक ५ मधील आरोग्य विभागाच्या कार्यालयाला अचानक भेट दिली. यावेळी त्यांनी कर्मचाऱ्यांच्या हजेरी पुस्तकाची तपासणी करत गैरहजर आणि बेशिस्त कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे संकेत दिले आहेत.

# महाशिवरात्रीनिमित्त शिवभक्तांना फराळ वाटप

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील शिव मंदिरात नगरसेवक डॉ. विरन खडके, नगरसेविका विद्या सोनवणे, नगरसेवक पियूष कोल्हे यांच्याहस्ते पूजा होऊन भोलेनाथांची आरती करण्यात आली. त्यानंतर महाशिवरात्रीनिमित्त भाविकांना फराळ वाटप करण्यात आला.**



महाशिवरात्रीनिमित्त शिवभक्तांसाठी साबुदाणा खिचडी, केळी अशा फराळाचे वाटप प्रमाणात करण्यात आले. त्यामध्ये ३००० भाविकांनी याचा लाभ घेतला. या प्रसंगी बेलपत्र वाहण्यात आली. आषाढी, महाशिवरात्री, कार्तिकी, रथोत्सवनिमित्त अर्पण सेवा ट्रस्ट, श्रीराम मित्र मंडळ, पवन चॅरिटेबल ट्रस्टतर्फे गेल्या १७ वर्षापासून सदरील उपक्रमात मोठ्या भक्ती भावाने फराळ वाटप करण्यात येतो. यंदाही शिवमंदिर परिसरात भाविकांना फराळ वाटप करण्यात आला.

याप्रसंगी डॉ. विलास नारखेडे, जागृत चौधरी, अनिल जोशी, परेश पाटील, पवन नारखेडे, बापू जोशी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यशस्वीतेसाठी अर्पण सेवा ट्रस्ट, श्रीराम मित्र मंडळ, पवन चॅरिटेबल ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# कानळदा ग्रामपंचायतीचा इतिहास घडवणारा कृतज्ञतेचा अविस्मरणीय सोहळा

प्रतिनिधी । जळगाव

जळगाव जिल्ह्यातील कानळदा हे जळगाव तालुक्यातील एक मोठे व प्रगत गाव असून येथे १७ सदस्यांची ग्रामपंचायत कार्यरत आहे. ग्रामपंचायत क्षेत्रातील घरपट्टी, पाणीपट्टी आदी विविध करांमधून जमा होणारा ग्रामनिधी हा गावाच्या विकासासाठी वापरला जातो. यावर्षी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत जमा झालेल्या निधीतून महिला व बालकल्याणासाठी निधी खर्च करण्याचे अधिकार ग्रामपंचायतीला प्राप्त झाले.



या अनुषंगाने कानळदा ग्रामपंचायतीचे सरपंच तथा सेवानिवृत्त पोलीस उपअधीक्षक पुंडलिक तुळशीराम सपकाळे यांनी अत्यंत उत्कृष्ट नियोजन करून अंगणवाडी सेविका, मदतनीस व आशा वर्कर्स(आशा स्वयंसेवक) या २९ कर्तृत्ववान महिलांसाठी ग्रामपंचायत मार्फत भव्य व उत्कृष्ट कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी या सर्व महिलांचे आगमन होताच ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात पुष्पवृष्टी करून त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले. त्यानंतर समारंभपूर्वक उच्च दर्जाच्या साड्या व पुष्पगुच्छ देत त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जळगाव महानगरपालिकेच्या नवनियुक्त नगरसेविका व कानळद्याची सुकन्या भारतीताई सागर सोनवणे उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते महिलांचा सन्मान करण्यात आला. यावेळी त्यांचाही उपस्थित महिलांच्या हस्ते नागरी सत्कार करण्यात आला. पुंडलिक सपकाळे यांनी मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाला अंगणवाडी पर्यवेक्षिका अर्चना धामोरे मॅडम व मंगला सपकाळे मॅडम प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. या भव्य आयोजनाने त्या भावूक झाल्या व त्यांनी कानळदा ग्रामपंचायतीच्या या कृतज्ञतेच्या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.

# कितीही संकटे वा अडचणी येवोत स्वतःला सिद्ध करा

## सकल ज्ञान महोत्सव बक्षीस वितरण प्रसंगी डायटचे माजी प्राचार्य नीळकंठ गायकवाड यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव

**स्वतःची पुनर्निर्मिती करीत रहा. कितीही संकटे वा अडचणी येवोत स्वतःला सिद्ध करा, असे आवाहन डायटचे माजी प्राचार्य नीळकंठ गायकवाड यांनी केले.**



नीळकंठ गायकवाड यांनी छत्रपती शिवाजी व सवंगड्यांची रायरेश्वराच्या मंदिरातील स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा, जिवा महाला, सैय्यद बंडा यांची स्वराज्यनिष्ठा, अतुलनीय युद्धकौशल्य, पराक्रम, त्याग, सेवा व समर्पणाचे ऐतिहासिक प्रेरक प्रसंग सांगून रोमांचित केले. जनमत प्रतिष्ठान व मुक्ताई महिला बहुउद्देशीय संस्था जळगाव यांच्या संयुक्त आयोजनांतर्गत समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव सकल ज्ञान महोत्सव सन्मान व बक्षिस वितरण सोहळा-२०२६ अल्पबचत भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव येथे दि. १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजता उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे पुर्वाध्यक्ष आमदार राजुमामा भोळे होते. विचारपीठावर प्रमुख वक्ते अर्थात महागुरू नीळकंठ गायकवाड, महापौर दीपमाला काळे, माजी महापौर जयश्री महाजन, भुसावळच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष गायत्री भंगाळे, शिक्षण विस्तार अधिकारी विजय पवार, जी.एच. रायसोनी कॉलेजचे प्रा. रफिक शेख, हेल्थ प्लस इन्स्टिट्यूटच्या संचालिका भारती काळे, आर. सी. पटेल संस्था, शिरपूरचे सुनील पाटील, ॲड .निखिल पाटील, सिने गायक संघपाल तायडे, आर्चिज ब्यूटी अकॅडमीच्या संचालिका अर्चना माळी, मुक्ताई महिला बहुउदेशीय संस्थेच्या अध्यक्ष व माजी नगरसेविका निता सोनवणे आदी उपस्थित होते.प्रस्तावना किशोर पाटील, सुत्रसंचालन किशोर पाटील यांनी केले.

### ■ सन्मानित झालेले पुरस्कारार्थी

ज्ञानवंत शिक्षिका पुरस्कार माया आमोदकर, ज्ञानवंत मुख्याध्यापक प्रा.व्ही. एम.चौधरी, दिलीपकुमार जाधव, छाया नाईक, सुरेश अहिरे, वंदना शिर्के, विजय चौधरी तर ज्ञानवंत शिक्षक शिक्षिका-दिगंबर बाविस्कर, वर्षा अहिरराव, नीता वानखेडकर, भारती ठाकरे, अलका पितृभक्त, प्रज्ञा नारखेडे, समाज प्रबोधन क्षेत्रात प्रा.दिलीप भारंबे, शैक्षणिक क्षेत्र - सुवर्णा अडकमोल , स्मिता जयकर, सुनील पाटील, प्रताप कुमावत, योगेंद्र पवार ,चेतन बिरारी , चंद्रकांत पाटील, सामाजिक क्षेत्र - शैलेंद्र ठाकूर , ॲड. निखिल पाटील, ॲड. सागर सरोदे , मनिषा पाटील, पुजा पंडित समाजसेवक- मिनाक्षी भोसले , रोहित महाले, आरोग्य सेवक ज्ञानेश्वर पाटील, आरोग्यदूत -भारती काळे, डॉ. उल्हास बेंडाळे ब्युटीशियन-मयुरी बडगे, जागृती भंगाळे, पत्रकारीता ईश्वर महाजन, चंदन पाटील, अजय भामरे, रवि मोरे, शेती - प्रताप सोनवणे , रमेश झारखंडे पर्यावरण - वसंत पाटील, क्रिडा - सागर सोनवणे आदींचा पुरस्कार देवून सन्मान करण्यात आला.

# चोपडा-विरवाडे रस्त्यावर भीषण अपघात

## दोन तरुण जागीच ठार, तिघे गंभीर

प्रतिनिधी । चोपडा

**चोपडा-विरवाडे रस्त्यावर आज पहाटे झालेल्या भीषण अपघातात दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला असून तिघेजण गंभीर जखमी झाले आहेत. सकाळी सुमारे ५.३० वाजेदरम्यान विरवाड्याहून चोपड्याकडे येत असताना आर्टिका कार (क्र. एमएच १९ बीएस १००८) नियंत्रणाबाहेर जाऊन अपघातग्रस्त झाली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.**





या दुर्घटनेत राहुल अमृत भोई आणि मयूर अरुण राजपूत या दोघा तरुणांचा जागीच मृत्यू झाला. अपघाताची तीव्रता इतकी होती की, वाहनाचे मोठे नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. जखमींना त्वरित रुग्णालयात हलविण्यात आले. जखमींमध्ये विजय अमृत भोई (वय ३५), राकू राजपूत (वय अंदाजे ३०) आणि बंटी कोळी (वय ३०) यांचा समावेश आहे.

विजय भोई यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी जळगाव येथे हलविण्यात आले आहे. तर राकू राजपूत आणि बंटी कोळी यांच्यावर चोपड्यातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. एकाच्या पायाला तर दुसऱ्याच्या हाताला गंभीर दुखापत झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. मृत आणि जखमी झालेले सर्व तरुण जैन समाजाच्या पारमार्थिक धार्मिक कार्यक्रमासाठी चोपड्याकडे येत होते. गेल्या आठ दिवसांपासून ते कठोर उपवास करत होते, अशी माहिती नातेवाईकांनी दिली. आज कार्यक्रमाचा शेवटचा दिवस असल्याने दुपारनंतर उपवास सोडण्याचा त्यांचा मानस होता. मात्र त्याआधीच काळाने झडप घातल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### ‘देवा तू खरंच आहेस तरी कुठे?’

**मृत आणि जखमी झालेले सर्व तरुण जैन समाजाच्या धार्मिक कार्यक्रमासाठी गेल्या आठ दिवसांपासून उपवास करत होते. इतका कठोर उपवास करूनही ही दुर्दैवी घटना घडल्याने नातेवाईकांनी घटनास्थळी आक्रोश केला. असा हृदय पिळवटून टाकणारा टाहो त्यांनी फोडला. आज कार्यक्रमाचा शेवटचा दिवस असून साडेतीननंतर घरचे अन्न-पाणी घेणार होते. मात्र त्याआधीच काळाने झडप घातल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.**

# अडावद येथील सार्वजनिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना भावपूर्ण निरोप

प्रतिनिधी । अडावद

**अडावद (ता.चोपडा येथील सार्वजनिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक ए. जे. कदम हे होते. व्यासपीठावर ज्येष्ठ शिक्षक एम. जी. पाटील, उपशिक्षिका शुभांगी देशमुख, सौ. नलिनी पाटील तसेच सपना कोळी उपस्थित होते.**




कार्यक्रमाची सुरुवात मुख्याध्यापक ए. जे. कदम व मान्यवर शिक्षकांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला व शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. ज्येष्ठ शिक्षक एम. जी. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शाळेत मिळालेले संस्कार आणि शिस्त जीवनात आचरणात आणण्याचे आवाहन केले. मोठी स्वप्ने पाहा, स्वतःची क्षमता ओळखा आणि योग्य विद्याशाखेची निवड करा. समाजसेवा करा व आई-वडिलांची मान उंचावेल असेच कार्य करा, असा संदेश त्यांनी दिला.

आर. आर. देशमुख, नलिनी पाटील व सपना कोळी यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेची तयारी, उत्तरपत्रिका लेखन कौशल्य आणि अभ्यासाचे नियोजन याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक अशोक कदम यांनी परीक्षेचे बदललेले नियम समजावून सांगत विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने परीक्षेला सामोरे जाण्याचे आवाहन केले. यशस्वी जीवनासाठी आवश्यक मंत्र आणि तंत्र सांगून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सचिन पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आर. टी. मोरे, श्रीमती सारिका चरडे, श्रीमती ज्योती पाटील, नितीन महाजन, हर्षद कंखरे, पंकज भोसले, प्रशांत पवार, जीवन सिसोदे तसेच इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## थोडक्यात

### अवैध वाळू वाहतूक कोणाच्या कृपाशीर्वादाने ?

**यावल ।** कोळन्हावी-डांभुर्णी-किनगाव यावल मार्गे गिरणेची वाळू अवैधरित्या रात्रीच्या वेळी महसूलच्या कर्मचाऱ्यांचे आशीर्वादाने मोठ्याप्रमाणावर सुरू आहे.
रात्रीच्या वेळी सुमारे ५० वर डंपर अवैधरित्या वाळु याच मार्गाने मारूळ, न्हावी, फैजपूर परिसरातही जाते. काही ठराविक गाड्या पास झाल्यात की संबंधित यंत्रणेचे काही तलाठी या अवैध वाहतूक करणाऱ्या गाड्यांच्या मालकांची मोबाईलवरून थेट संपर्कात असतात. रात्रीचे वेळी असलेली टीमच्या मोबाईलचे डीसीआर तपासल्यास मोठे घबाड उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### माता रमाई जयंतीनिमित्त २१ जणांचा गुणगौरव

**भुसावळ ।**डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनच्या वतीने त्यागमूर्ती माता रमाई यांच्या १२८व्या जयंतीनिमित्त भुसावळ येथे गुणगौरव पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला. रेल्वे स्टेशनजवळील कृष्णचंद्र सभागृहात आयोजित कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या २१ मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. अध्यक्षस्थानी फाऊंडेशनचे संस्थापक सुधीर कांबळे (मुंबई) होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. निता वानरके (कोल्हापूर), भुसावळ नगराध्यक्षा गायत्री भंगाळे, रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष विनोद सोनवणे, नगरसेवक उल्हास पगारे, एस.सी./एस.टी. असोसिएशनचे झोनल अध्यक्ष सुधीर जंजाळे, दिनेश इखारे, देवदत्त मकासरे, पूजा तायडे, शोभा इंगळे, भारती म्हस्के आदी उपस्थित होते.

# ट्रेसर्स असोसिएशन (मृ सं) राज्याध्यक्षपदी व्यंकटेश हालिंगे; कोषाध्यक्ष यशवंत जडे

प्रतिनिधी । चोपडा

**कृषी विभागातील अनुरेखक संवर्गाच्या ट्रेसर्स असोसिएशन (मृ सं) महाराष्ट्र राज्यच्या १२ व्या सुवर्णमहोत्सवी राज्य अधिवेशनात नवीन राज्यस्तरीय कार्यकारिणीची एकमताने निवड जाहीर करण्यात आली.**

परभणी येथे पार पडलेल्या या अधिवेशनात राज्याच्या अध्यक्षपदी लातूर विभागाचे व्यंकटेश हालिंगे, सरचिटणीसपदी ठाणे विभागाचे सिद्धार्थ पवार तर कोषाध्यक्षपदी नाशिक विभागाचे यशवंत जडे यांची निवड झाली.निवडणूक निर्णय अधिकारी तथा संघटनेचे कायदेशीर सल्लागार अॅड. चंदूलाल सदाशिव शहा यांनी पदाधिकाऱ्यांची अधिकृत घोषणा केली. राज्य उपाध्यक्ष म्हणून नंदकुमार







परांडकर (लातूर), श्यामराव जोशी (कोल्हापूर), राजेंद्र ठाकरे (नागपूर), अनिल खंडारे (अमरावती), गजानन शेलार (पुणे), विलास मनोहरराव निगवेकर (संभाजीनगर) तसेच महिला प्रतिनिधी म्हणून जयश्री साळवी-भिसे यांची निवड झाली. विभागीय सचिव म्हणून प्रमोद रावके (लातूर), बाळासाहेब ठोंबरे (कोल्हापूर), अभय चिखले (नागपूर), राजेश बनचरे (अमरावती), वैशाली साबळे (पुणे), वाय. डी. चव्हाण (नाशिक), सुनील नेतकर (ठाणे) व पद्माकर महामुनी (संभाजीनगर) यांची निवड जाहीर करण्यात आली.

# अडावदला महाशिवरात्रीनिमित्त आयोजित भजन संध्येत बत्तीगूल



प्रतिनिधी । अडावद ता.चोपडा

**अडावद येथील परिसरात महाशिवरात्रनिमित्त रविवारी रात्री ८.३० वाजता भजन संध्याचा कार्यक्रम भक्तिभावात संपन्न झाला. परिसरातील शेकडो भाविकांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.**

भजन गायिका हिताशी गुरव व गायक विशाल सपकाळे यांनी शिवभक्तीपर गीते सादर करून वातावरण मंत्रमुग्ध केले. ‘बोल बम का नारा है, बाबा तू ही एक सहारा है,’ या गजराने मंदिर परिसर दुमदुमून गेला होता. टाळ-मृदुंगाच्या निनादात भाविक तल्लीन झाले होते. मात्र कार्यक्रम रंगात आलेला असतानाच अचानक वीजपुरवठा खंडित झाला. तब्बल दोन तास वीज न आल्याने कार्यक्रम अर्धवट थांबवावा लागला. त्यामुळे भाविकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त झाली.

### वीजपुरवठा खंडित झाल्याने भाविकांची नाराजी

अंधारामुळे महिला, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना गैरसोयीला सामोरे जावे लागले. धार्मिक कार्यक्रमांच्या वेळी अखंडित वीजपुरवठ्याची व्यवस्था करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. धार्मिक कार्यक्रमावेळी असंख्य स्त्री-पुरुष एकत्र येत असतात. अशावेळी वीज प्रवाह खंडित झाला तर वृद्ध भाविकांना घरी जातांना पायवाट दिसत नाही. त्यांचा अपघात होऊ शकतो. अथवा काही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी वीज पुरवठा खंडित होऊ नये, यासाठी खबरदारी घ्यावी, अशी मागणी होत आहे.

### फार्मसीच्या विद्यार्थ्याची गळफास घेऊन आत्महत्या

प्रतिनिधी । जळगाव

येथील शिरसोली रस्त्यावर असलेल्या गुलाबराव देवकर कॉलेज ऑफ फार्मसी येथील फार्मसीचे द्वितीय वर्षात शिक्षण घेत असलेल्या एका विद्यार्थ्याने नेहरू नगर येथील खोलीत गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना रविवारी संध्याकाळी घडली आहे. विद्यार्थ्यांच्या खिशात आढळलेल्या सुसाईड नोटनुसार गुन्हा दाखल करण्याची मागणी विद्यार्थ्यांच्या पालकांनी केली आहे.

# दिव्यांग बांधवांना स्वावलंबी बनवण्याची संधी द्या

## दिव्यांगांना व्हिलचेअर, तीनचाकी सायकल वाटप प्रसंगी वस्त्रोद्योग मंत्री सावकारे

प्रतिनिधी । वरणगाव

**राज्य शासनाच्या उपक्रमांतर्गत आज आयोजित विशेष साहित्य वितरण कार्यक्रमात उद्योगमंत्री संजय सावकारे यांनी दिव्यांग बांधवांसाठी बॅटरीवर चालणाऱ्या तीनचाकी सायकल व व्हिलचेअर वितरण केले. या उपक्रमाचा उद्देश दिव्यांग व्यक्तींना दैनंदिन जीवनात स्वावलंबी बनवणे आणि समाजातील सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे हा आहे.**

राज्य शासनाच्या उपक्रमांतर्गत आज आयोजित विशेष साहित्य वितरण कार्यक्रमात उद्योगमंत्री संजय सावकारे यांनी दिव्यांग बांधवांसाठी बॅटरीवर चालणाऱ्या तीनचाकी सायकल व व्हिलचेअर वितरण केले. कार्यक्रमात स्थानिक अधिकारी, समाजसेवी संस्था आणि मोठ्या संख्येने दिव्यांग बांधव उपस्थित होते. यावेळी भारतीय कृतीम अंग निर्माण निगम (अलिम्को), इंडियन रेडक्रॉस सोसायटी जळगाव, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र जळगाव, आणि एकता दिव्यांग बहुउद्देशीय संस्था वरणगाव यांनी सहकार्य केले.




साहित्य वितरणात व्हीलचेअर ७, बॅटरी सायकल ५, कर्ण मशीन, कुबडी, वाकर, काठी, एल बो क्लच यांसह एकूण २७ लाभार्थ्यांना मदत करण्यात आली.

# पतीला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पत्नीसह ७ जणांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी । जळगाव

**पत्नीचे गावातील एकाशी असलेल्या प्रेमसंबंधांमुळे वारंवार मानसिक त्रासामुळे नैराश्यात आलेल्या एका ३८ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना जळगाव तालुक्यातील नांद्रे येथे घडली आहे. या प्रकरणी जळगाव तालुका पोलीस स्टेशनमध्ये मृत तरुणाच्या आईच्या फिर्यादीवरून पत्नीसह एकूण ७ जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

मृत सुरेश हिरामण बाविस्कर (वय ३८, रा. नांद्रे बु।।, ) याची पत्नीचे गावातीलच मोहन विलास सपकाळे याच्याशी प्रेमसंबंध होते. या कारणावरून कुटुंबात सातत्याने वाद होत होते. आरोपींने त्याला धमकी दिली होती. त्यानंतर मानसिक त्रासामुळे सुरेशने शेतात झाडाला गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली. याप्रकरणी सात जणांवर गुन्हा दाखल केला आहे. यात सोनी सुरेश बाविस्कर (पत्नी), मोहन विलास सपकाळे, विशाल कैलास कोळी, भारती पंढरीनाथ तायडे, ईश्वर पंढरीनाथ तायडे, जया गणेश सपकाळे, गणेश विजय कोळी यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

# वृत्तपत्रकारितेला बबन कांबळे यांनी दिली नवी दिशा : जयसिंग वाघ

प्रतिनिधी । भुसावळ

**समाजातील अन्याय, अत्याचार आणि शासनाच्या चुकीच्या धोरणांवर बोट ठेवून राष्ट्रीय कार्य करणारी जबाबदार संस्था म्हणजे वृत्तपत्र. मात्र अनेकदा भारतीय वृत्तपत्रे एकांगी भूमिका घेत असल्याचे दिसते. परंतु दैनिक सम्राटचे संस्थापक संपादक बबन कांबळे यांनी या प्रवाहाला छेद देत निर्भीड आणि धाडसी पत्रकारितेचा आदर्श निर्माण केला. ‘स्वतंत्र सम्राट’च्या माध्यमातून त्यांनी वृत्तपत्रकारितेला नवी दिशा दिली, असे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत जयसिंग वाघ यांनी केले.**



भुसावळ येथील पंचायत समिती सभागृहात १५ फेब्रुवारी रोजी आयोजित बबन कांबळे यांच्या तृतीय स्मृतिदिन कार्यक्रमात मुख्य वक्ते म्हणून ते बोलत होते.
वाघ म्हणाले की, दबलेल्या घटकांचे मुखपत्र म्हणून कार्य करताना कांबळे यांनी दलित, आदिवासी व भटक्या समाजाशी थेट नाळ जोडली. वाड्या-वस्त्यांवर जाऊन प्रश्न जाणून घेत त्यांनी सम्राटच्या माध्यमातून अन्यायाविरुद्ध आवाज उठविला. असे त्यांनी नमूद केले.
कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी री. पा. ई.चे जिल्हाध्यक्ष राजुभाऊ सूर्यवंशी होते. त्यांनी मनोगतात सांगितले की, कांबळे यांनी मंत्रालयापर्यंत सम्राटचा दबदबा निर्माण केला. यावेळी नगरसेवक रोहन सूर्यवंशी, नगरसेविका शोभा इंगळे, पूजा तायडे यांचा सत्कार करण्यात आला.


# सपोनि प्रशांत कंडारे यांची ‘सिंघम स्टाईल’ धडक कारवाई

## तारचोरांची टोळी चार तासांत जेरबंद; पाळधी पोलिसांनी मुद्देमालासह आरोपीला केली अटक

प्रतिनिधी । पाळधी

**वराड (ता. धरणगाव) येथे सोलर प्लांटवरील वीजतार चोरुन नेल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला होता. याचा छडा पाळधी पोलिसांनी अवघ्या चार तासांत करून मुद्देमालासह आरोपीला अटक करण्यात यश मिळवले आहे.**

पाळधी येथून जवळच असलेल्या वराड येथे बंद पडलेल्या सोलर प्लांटवरील वीजतार चोरी करण्यात आली होती. याबाबत पाळधी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत पाळधी पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार महामार्गावरील एकलग्न गावाजवळ पोखरी रस्त्याला लागून असलेल्या पाटचारीवरुन आरोपी एका चारचाकी वाहनाने जात असल्याचे समजले. त्यानुसार त्यांचा सिंघमस्टाईल पाठलाग करुन त्यांना पकडण्यात आले.



यावेळी बोलेरो पीकअप गाडी क्रमांक एम.एच.०४ जी.एफ.४१७२ मध्ये वीजतारांच्या बंडलांसह अजय बापू गायकवाड व दोन अल्पवयीन मुले मिळून आली. त्यांना ताब्यात घेऊन पाळधी पोलीस चौकी येथे नेण्यात आले. त्यांनी गुन्ह्याची कबुली देऊन आमचे अजून सहा साथीदार असून त्यांनी चोपडा, अडावद या भागातही चोरी केली असल्याचे कबुल केले आहे. याप्रकरणी अजय गायकवाड यास अटक करण्यात आली असून दोन्ही अल्पवयीन मुलांना रिमांड होम येथे पाठविण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, अप्पर पोलीस अधीक्षक कविता नेरकर, चोपडा भागाचे पोलीस उपविभागीय अधिकारी श्री.घोलप, धरणगाव पोलीस निरीक्षक सुनील पवार, पाळधीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रशांत कंडारे, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय बडगुजर, संघपाल तायडे, योगेश सोनवणे, मोहन पाटील आदींच्या पथकाने केली. या घटनेचा पुढील तपास दत्तात्रय बडगुजर हे करीत आहेत.

### चोरांच्या आवळल्या मुसक्या

**शहर व परिसरात वाढत्या वीजतार चोरीच्या घटनांमुळे नागरिक त्रस्त झाले असताना पोलिसांनी धडाकेबाज कारवाई करत तारचोरांच्या टोळीला अवघ्या चार तासांत जेरबंद केले. या कारवाईचे नेतृत्व पोलीस उपनिरीक्षक प्रशांत कंडारे यांनी केले. संशयित वाहनाचा पाठलाग करत अजय बापू गायकवाड याला ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता,**



**या टोळीत दोन विधीसंघर्षित बालकांसह एकूण नऊ जणांचा सहभाग असल्याची धक्कादायक माहिती समोर आली. पोलिसांनी केलेल्या कारवाईत ॲल्युमिनियम वीज तारा ४ लाख ५० हजार रुपये किमतीच्या (इलेक्ट्रिक पोलवरून चोरलेल्या) तसेच, बोलेरो पिकअप वाहन ६ लाख रुपये किमतीचे (क्र.एमएच ०४ जीएफ ४८७२) असा एकूण १० लाख ५० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.**